यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक : कुलसचिव

विषय: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीबाबत...

धारिका : सेवा सुविधा/२०२४/724

प्रति : प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अध्यासन

दिनांक : ३०/०३/२०२४

**विषय : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त कार्यक्रमा विषयी**

मा. महोदय,

दिनांक १४/०४/२०२४ रोजी महामानव डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त दिनांक १३/०४/२०२४ शनिवार रोजी दुपारी ३.३० वा. प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, अमळनेर, यांचे **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार"** या विषयावर मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने व्याख्यान आयोजित केलेले आहे.

तरी कृपया वरीलप्रमाणे योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या अध्यासन मार्फत करावी. यासाठी प्रशासकिय व वित्तीय येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

कार्यवाही करावी हि विनंती.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

(दिलीप भरड)
कुलसचिव

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
आवक क्र.: 202
दिनांक : 01/04/2024

डॉ. आंबेडकर
अध्यासन

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान

### विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार

### कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| दि.१३ / ०४/ २०२४<br>शनिवार<br>दुपारी — 3:00 pm<br><br>शैक्षणिक इमारत सभागृह | पाहुण्यांचे विचारमंचावर आगमन<br><br>**अध्यक्ष :** मा. कुलगुरू, प्रा. डॉ. संजीव सोनवणे<br>(यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक)<br>**प्रमुख वक्ते :- प्रा. ज्ञानेश्वर कांबळे**<br>(मराठी विभाग, प्रताप महाविद्यालय, अमळनेर )<br><br>**विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार**<br><br>**अध्यासन प्रमुख :-** प्रा. नागार्जुन वाडेकर<br><br>**सूत्रसंचालन :-** श्री. धम्मरत्न जावळे |
| | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण** |
| 3.05 pm | **प्रमुख वक्ते यांचा परिचय :-** डॉ. बाळासाहेब दिघे |
| | **!! पाहुण्यांचे स्वागत !!**<br>**प्रमुख वक्ते:-** प्रा. ज्ञानेश्वर कांबळे<br>**अध्यक्ष :- मा.कुलगुरू,** प्रा. डॉ. संजीव सोनवणे<br><br>**अध्यासन प्रमुख :-** प्रा. नागार्जुन वाडेकर |
| 3.10 pm | **प्रास्ताविक**<br>**अध्यासन प्रमुख :-** प्रा. नागार्जुन वाडेकर |
| 3.12 pm | **! व्याख्यान !**<br>**प्रमुख वक्ते :- प्रा. ज्ञानेश्वर कांबळे**<br>**विषय: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार !** |
| 4.00 pm | **अध्यक्षीय समारोप :-** मा. कुलगुरू, प्रा. डॉ. संजीव सोनवणे |
| 4.30 pm | **आभार :-** डॉ. सुनील भारोडकर |

डॉ बाबासाहेब
आंबेडकर
अध्यासन
16/4/2

लोकमत
नाशिक, रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ ४

न्यूज Inbox

प्रा. कांबळे : मुक्त विद्यापीठातर्फे व्याख्यान

# डॉ. आंबेडकरांकडून मानवी मूल्यांचा अंगीकार

नाशिक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायमच मानवी मूल्य, समाज उन्नतीचा अंगीकार केला. ते शिक्षणाचे तीन टप्पे मानत असे. ते म्हणजे साक्षर, शिक्षित आणि संस्कारित म्हणजेच विवेकशील. काय चांगले आणि काय वाईट यातला फरक समजायला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी स्वातंत्र्य हे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्यांनी मानवतावादी स्वातंत्र्याला महत्त्व दिल्याचे प्रतिपादन प्रमुख वक्ते अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयाचे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या वतीने मुक्त विद्यापीठाच्या सभागृहात शनिवारी (दि.१३) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार' यावर प्रा. डॉ. कांबळे बोलत होते. यावेळी



व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड, अध्यासनाचे प्रमुख नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

यावेळी प्रा. डॉ. कांबळे पुढे म्हणाले की, फुले, आंबेडकर आणि इतरही आपल्या समाजसुधारकांच्या विचारांची शिदोरी आपण पुढे घेऊन गेलो, तरी आपला देश पुढे घेऊन जाण्यास आपल्याला नक्कीच मदत होईल. यावेळी कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
आवक क्र.: 226
दिनांक : 16/04/2024

सकाळ नाशिक, सोमवार, १५ एप्रिल २०२४

# डॉ. आंबेडकरांनी मानवतावादी स्वातंत्र्याला महत्त्व दिले

## डॉ. ज्ञानेश्वर कांबळे : मुक्त विद्यापीठात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आयोजित व्याख्यानाप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर कांबळे. शेजारी कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन आदी.

नाशिक, ता. १४ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायमच मानवी मूल्य, समाज उन्नतीचा अंगीकार केला. साक्षर, शिक्षित आणि संस्कारित म्हणजेच विवेकशील असे शिक्षणाचे तीन टप्पे ते मानायचे. त्यांनी मानवतावादी स्वातंत्र्याला नेहमीच महत्त्व दिले, असे प्रतिपादन अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठ शैक्षणिक इमारतीत झालेल्या व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार'' असा व्याख्यानाचा विषय होता.

कार्यक्रमाच्या सुरवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड, अध्यासनाचे प्रमुख नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, की भारताच्या विकासासंदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कर्तृत्व मोठे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचारदेखील त्यांनी त्याकाळात केला. त्यांनी ज्ञानाला खूप महत्त्व दिले, असे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाचे प्रमुख नागार्जुन वाडेकर यांनी केले. सूत्रसंचालन धम्मरत्न जावळे यांनी केले. परिचय बाळासाहेब दिघे यांनी केला. आभार सुनील भारूडकर यांनी मानले.

पुण्यनगरी | सोमवार, १५ एप्रिल २०२४ | नाशिक

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्यावतीने बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अंमळनेच्या प्रताप महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवतावादी विचार' या विषयावरील व्याख्यान पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. याप्रसंगी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड, अध्यासनाचे प्रमुख नागार्जुन वाडेकर हे देखील उपस्थित होते. यावेळी डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी कायमच मानवी मुल्य, समाज उन्नतीचा अंगिकार केला. बाबासाहेब शिक्षणाचे तीन टप्पे मानत असे. ते म्हणजे साक्षर, शिक्षित आणि संस्कारीत म्हणजेच विवेकशिल. यामुळे काय चांगले आणि काय वाईट यातला फरक त्यास समजायला पाहिजे, असे त्यांचे मत असे. बाबासाहेबांनी स्वातंत्र्य हे मुल्य रूजवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी समाजातील वंचित घटकांतील लोकांना त्यांच्या अधिकाराची, अस्तित्वाची जाणीव करून दिली. पल्याला आपली पुढची पिढी चांगली घडवायची असेल, तर बाबासाहेबांचे विचार पुढे नेण्याची गरज आहे असेही त्यांनी नमूद केले.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतरही आपल्या समाजसुधारकांच्या विचारांची शिदोरी आपण पुढे घेऊन गेलो, तरी आपला देश पुढे घेऊन जाण्यास आपल्याला नक्कीच मदत होईल, असे त्यांनी शेवटी नमदू केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी सांगितले की, भारताच्या विकासासंदर्भात बाबासाहेबांचे मोठे कतृत्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार देखील बाबासाहेबांनी त्याकाळात केला. त्यांनी ज्ञानाला खूप महत्व दिले. शिक्षण देताना अशा प्रकारे शिक्षण दिले पाहिजे, की त्यातून शिलवान प्रजा निर्माण होईल, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. अध्यासनाचे प्रमुख नागार्जुन वाडेकर यांनी प्रास्ताविक केले, धम्मरत्न जावळे यांनी सुत्रसंचालन केले. सुनील भारूडकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध विद्याशाखेचे संचालक, प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामना सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतावादी स्वातंत्र्याला महत्त्व दिले - डॉ. ज्ञानेश्वर कांबळे

## मुक्त विद्यापीठात व्याख्यान

नाशिक, दि. १४ (सा.वा.) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी मूल्य, समाज उन्नतीचा अंगीकार केला. साक्षर, शिक्षित आणि संस्कारीत म्हणजेच विवेकशील असे शिक्षणाचे तीन टप्पे असल्याचे ते मानत. त्यांनी कायमच मानवतावादी स्वातंत्र्याला महत्त्व दिले, असे प्रतिपादन जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी बोलताना डॉ. कांबळे पुढे म्हणाले की, शिक्षणाने माणसाला चांगल्या, वाईटातला फरक कळतो. बाबासाहेबांनी स्वातंत्र्य हे मूल्य रूजवण्याचा प्रयत्न केला. समाजातील वंचित घटकांना त्यांच्या अधिकाराची, अस्तित्वाची जाणीव करून दिली. महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर समाजसुधारकांच्या विचारांची शिदोरी घेऊन आपण पुढे गेल्यास देशाची प्रगती होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत मांडले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार डॉ. आंबेडकरांनी त्या काळात केला. ज्ञानाला महत्त्व दिले. शिक्षणाने शीलवान प्रजा निर्मिती होईल असा त्यांना विश्वास होता. बाबासाहेबांनी जगाला दिशा दिली. अनेक देशांनी भारतीय राज्यघटनेचा अभ्यास करून त्यांच्या देशाच्या घटना तयार केल्याचे सोनवणे यांनी नमूद केले.

अध्यासन प्रमुख नागार्जुन वाडेकर यांनी प्रास्ताविक, तर सूत्रसंचालन धम्मरत्न जावळे यांनी केले. परिचय बाळासाहेब दिघे यांनी करून दिला. आभार सुनील भारूडकर यांनी मानले. त्याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य तथा संचालक डॉ. जयदीप निकम, कुलसचिव दिलीप भरड आदींसह विद्यापीठाच्या विविध विद्याशाखेचे संचालक, प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी, शिक्षण संस्थेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपलं महानगर मंगळवार, १६ एप्रिल २०२४

# मुक्त विद्यापीठात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात



✦ नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, संचालक डॉ. प्रकाश देशमुख, ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे, जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, उपकुलसचिव डॉ. चंद्रकात पवार, विजयकुमार पाईकराव, सुनील निकम आदी मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि डॉ. जयदिप निकम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उत्तुंग अशा कार्याबद्दल उपस्थितांसमोर आपले विचार व्यक्त केले. संतोष साबळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.